सोबत संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांचे **इयत्ता १० वी १२वी च्या पुनर्परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांनी तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील इयत्ता १० वीनंतरचे प्रथम वर्ष अभियांत्रिकी/तंत्रज्ञान/वास्तुकला पदविका,इयत्ता १२ वीनंतरचे औषधनिर्माणशास्त्र,एचएमसीटी,सरफेस कोटींग टेक्नॉलॉजी पदविका आणि इयत्ता १२वी/आयटीआय नंतरचे थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरिता नोंदणी करणेबाबत** परिपत्रक क्रमांक क्र.१०/एडीएम/पदविका प्रवेश/२०२३/७४७ दिनांक २९/०८/२०२३ सोबत जोडलेले आहे. कृपया त्याचे अवलोकन करावे व त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

क्र.विकाअ/शिक्षण/पदविका प्रवेश /२०२३/ 2428
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,अमरावती.
दि. 30 AUG 2023

**प्रति,**

**प्राचार्य,** अभियांत्रिकी पदविका/औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था, अमरावती विभाग,अमरावती यांना सदर परिपत्रकामध्ये दिलेल्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही करण्याकरीता अग्रेषित.

**(डॉ.वि.रं.मानकर)**
**प्र.सहसंचालक,**
तंत्रशिक्षण,विभागीय कार्यालय,
अमरावती.

**प्रत**:

**१.प्रोग्रामर**,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,अमरावती यांना विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.
**२.सुचना फलक,** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,अमरावती.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०/४६५/४९२
ई-मेल - desk10@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

(संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी)
परिपत्रक क्रमांक : १०/एडीएम/पदविका प्रवेश/२०२३/७४७ दिनांक 29 AUG 2023

विषय: इयत्ता १० आणि १२वी च्या पुनर्परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांनी तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील इयत्ता १० वीनंतरचे प्रथम वर्ष अभियांत्रिकी/तंत्रज्ञान/वास्तुकला पदविका, इयत्ता १२ वीनंतरचे औषधनिर्माणशास्त्र, एचएमसीटी, सरफेस कोटींग टेक्नॉलॉजी पदविका आणि इयत्ता १२वी/आयटीआय नंतरचे थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरिता नोंदणी करणेबाबत...

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक परीक्षा मंडळ, पुणे यांचे वतीने जुलै - ऑगस्ट २०२३ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) पुरवणी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आलेला आहे. सदर पुरवणी परीक्षेत उत्तीर्ण झालेले विद्यार्थी संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या प्रथम वर्ष पदविका, थेट द्वितीय वर्ष पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थास्तरीय प्रवेशाकरिता पात्र आहेत.

त्यामुळे पुरवणी परीक्षेत उत्तीर्ण होऊन प्रवेशास पात्र असलेल्या उमेदवारांना संस्थास्तरीय प्रथम व थेट व्दितीय वर्ष पदविका प्रवेश प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी संचालनालयाच्या संकेतस्थळावर नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. अशा नोंदणी केलेल्या उमेदवारांना संस्थास्तरावरील प्रवेश प्रक्रियेत सहभागी होता येईल व प्रथम वर्ष पदविका आणि थेट द्वितीय वर्ष पदविका अभ्यासक्रमास प्रवेश निश्चित करता येईल.

१० वीनंतरचे प्रथम वर्ष अभियांत्रिकी/तंत्रज्ञान/वास्तुकला पदविका व १२वी/आयटीआय नंतरचे थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशप्रक्रियेच्या संस्थास्तरीय जागांसाठी ऑनलाईन नोंदणी व कागदपत्रांची पडताळणी, अर्ज निश्चिती करणे या प्रक्रिया प्रवेशाच्या अंतिम तारखेपर्यंत (कट ऑफ डेट पर्यंत) म्हणजेच दि. ८.९.२०२३ पर्यंत आणि इयत्ता १२ वीनंतरच्या औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमांसाठी दि. २०.९.२०२३ पर्यंत सुरू ठेवलेल्या आहेत. प्रवेशोत्सुक उमेदवारांनी https://dte.maharashtra.gov.in या संकेतस्थळास भेट देऊन संबंधित प्रवेश प्रक्रियेबाबत अधिक माहिती घ्यावी.

संस्थास्तरावरील कोट्यामधे व कॅपनंतर रिक्त राहिलेल्या जागांवर प्रवेश घेण्यास इच्छुक उमेदवारांनी ऑनलाईन नोंदणी करुन ई-स्क्रूटनी पध्दत किंवा प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दत याद्वारे, कागदपत्रांची पडताळणी व अर्ज निश्चिती करणे आवश्यक आहे. अर्ज निश्चिती झाल्यानंतर अशा उमेदवारांनी प्रवेशासाठी संस्थांमध्ये स्वतंत्रपणे अर्ज करणे आवश्यक आहे. संस्थेकडे अर्ज केलेल्या उमेदवारांची गुणवत्तायादी, संस्था पातळीवर संस्थेद्वारे तयार केली जाईल, व संस्थेने ठरवलेल्या वेळापत्रकाप्रमाणे प्रवेश प्रक्रिया संस्थेव्दारे राबविली जाईल. याकरीता इच्छुक उमेदवारांनी थेट संबंधित संस्थेकडे संपर्क साधावा व ह्या संधीचा लाभ घ्यावा.

(डॉ. विनोद म. मोहितकर)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई